नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/०३/२०२५ (गुरूवार) संध्याकाळ

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन खापरखेडा :— दिनांक १३/०३/२०२५ रोजी खापरखेडा पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, कन्हान नदीच्या पोटा घाट पत्रातुन अवैध रित्या रेतीचे उत्खनन करून रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पोटा घाट येथे गेले असता दोन संशयीत वाहन १) बोलोरो पिकअप गाडी क्रमांक एम. एच. ४० सी.डी. ५३९० आणि २) बोलोरो पिकअप गाडी क्रमांक एम. एच. ४० सी. टी. १९२८ असे मिळुन आल्या . पोलीसांनी दोन्ही वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती मिळुन आली. वाहन क्रमांक एम एच ४० सीडी ५३९० चा चालक **आरोपी नामे आकाश संजय धुर्वे, वय २१ वर्षे ,राहणार वार्ड क्रमांक १ चिचोली, खापरखेडा** आणि वाहन क्रमांक एम एच ४० सी टी १९२८ चा चालक नामे **गुलाब भगवानजी कांमडे, वय ३४ वर्षे, राहणार वार्ड क्रमांक २ चणकापूर असे मिळुन आले.** त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. दोन्ही आरोपीला अधिक विचारपुस केली असता आरोपी नामे **कार्तिक वेसने ,राहणार चिंचोली ता.सावनेर याच्या सांगण्यावरून अवैध रित्या रेतीची वाहतुक करीत असल्याची** माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष दोन्ही वाहनामधुन १) २ ब्रास रेती किंमती ८,००० /— रूपये आणि २) बोलोरो पिकअप गाडी क्रमांक एम. एच. ४० सी.डी. ५३९० आणि आणि बोलेरो पिकअप एम. एच. ४० सी.टी. १९२८ किंमती १०,००,०००/— रूपये असा एकुण **१०,०८,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद ३ आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे खापरखेडा येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर